विष्णुपुराण

भगवान विष्णु आपल्या शेषधारी आसनावर पहुडलेले आहेत. परंतु त्यांच्या डोक्यात विचारांचे वादळ उठलेले आहे. काय करावे हेच त्यांना सुचत नाहीये. स्रुष्टीचे पालन करताना एव्हढे आवतार घेतले पण राम अवतारात काय चुक झाली ते समजत नव्हते. फारच संवेदनशील, वादग्रस्त आणि चर्चेला उधाण आणणारा अवतार झाला होता. अगदी जन्मस्थानापासून चालू झालेला वाद आता सेतुपर्यन्त येउन पोचला होता. अजून कशा कशावर ह्या म्रुत्युलोकात चर्चा चालेल याचा विचार करुन त्यांच्या आंगावर शहारे येत होते. शेवटी त्यांनी हनुमंताला बोलावून घेतले..

"अंजनीसुता, तु आणि तुझ्या वानरसेनेने बांधलेला हा सेतु बघितलास..? अनेक शतके हा निसर्गाची आक्रमणे अंगावर समर्थपणे झेलत उभा आहे. तसुभर सुद्धा आपल्या जागेवरुन हलला नाही. नाहीतर हा हैद्राबादमधला आत्याधुनिक तंत्रद्यानाने बांधलेला कोसळला सुद्धा.. कोणीही त्यावरुन जाण्याआगोदरच.. खरेच, तुमच्या अविष्काराला कशाचीही तोड नाही."

"जय श्रीराम, प्रभो.. हे सर्व आपल्या आशिर्वादामुळे घडलेले आहे. प्रत्येक शिळेवर आपले नाव कोरले त्यामुळे हे साध्य झाले. आम्ही टिस्कोचे लोखंड अथवा ए.सी.सी चे सिमेंट मुळीच वापरलेले नाही. परन्तु प्रभो, आज अचानक सेतुची कशीकाय आठवण झाली..?"

"वत्सा, म्रुत्युलोकामधून अशी खबर आहे की तो सेतु पाडून तेथून कालवा काढायचा आहे. ह्या कामावर प्रचंड पैसा खर्च होणार आहे आणि पुढे पैसाही वाचणार आहे. परंतु ह्या सेतुच्या मुळे सध्या खूप वादविवाद निर्माण झाला आहे."

हनुमान अगतिकपणे म्हणाला, "मग आपण आत्ताच जाउन आपली बाजू मांडूयात."

...१

"अरे, ते शक्य नाही, आता काळ बदलला आहे. आपण गेलो तर सर्वप्रथम ते आपल्याकडे, आपले ऑळखपत्र मागतील. ना आपल्याकडे जन्माचा दाखला, ना शैक्षणिक प्रशिस्तिपत्रक. जन्मठीकाण आयोध्या सांगितले, तर आगोदरच वादातीत जागा. ह्या धनुर्धारी वेषात गेलो तर काहीजण ओळखतील, पण अर्जुनसिंग मला आदिवासी समजून  लगेच आय. आय. टी. मध्ये आरक्षित जागेवर नेमणुक करतील.  शिवाय सुटा–बुटा मध्ये सुद्धा जाता येणार नाही, भाविक आपल्यावर विश्वास ठेवणार नाहीत. हा खेळ कसा खेळायचा हेच उमगत नाही."

"मी शपथेवर सांगेन की मीच सेतु बांधला आहे".. हनुमान

"माझ्या प्रिय अंजनीसुता, असे करता येणार नाही. ते तुला सरकारने मंजूर केलेला सात–बारा चा उतारा मागतील. मग ह्याला पतपुरवठा कोणी केला त्याचा हिशोब मागतील. काम पुर्ण झाल्याचे प्रशिस्तिपत्रक मागतील. ह्यी सर्व कागदपत्रे कोठून आणशील. निव्रुत्त माणसाला सुद्धा त्याचे निव्रुत्तिवेतन मिळवण्यासाठी स्वतःला आणि वयाच्या दाखल्याला सादर करावे लागते, तिथे काहीही चालत नाहीरे. फार आवघड आहे हे."

"प्रभो, मला ह्या लोकांचे खरच कळत नाही. आपले दर्शन अनेक शतके असंख्य संत घेत आहेत. सुरदास, तुलसीदास, त्यागराज, जयदेव, भद्रचल रामदास, तुकाराम अशी अनेक नावे घेता येतील. परन्तु तरीही हे तुमच्या अस्तित्वावर शंका उपस्थित करतील..? मला ह्यातुन एकच तोडगा दिसतोय, पुन्हा एकदा रामायण घडवायचे आणि सरकारला त्याचे दस्ताएवज बनवायला लावायचे."

प्रभु हसले आणि म्हणाले, "अरे, हे आता शक्य नाही. रावणाला चिन्ता वाटते आहे की, करुणानिधि त्याला संत समजतील. आणि तुला आठवतोय रावणाच्या मामा मारीच, जो सीताहरणात सुवर्णम्रुग झाला होता. त्याने तर प्रुथ्वीवर यायाला साफ़ नकार दिला आहे. त्याला भिती वाटते, माझ्या ऐवजी सलमान खानने त्याचा वध केला तर पुढे काय...?"

शेवटी दोघानी ह्या विषयावरील चर्चा थांबवली. जे घडेल ते बघायचे व सोसायचे असे ठरवले आणि एकमेकांचा निरोप घेतला.